-: प्रेसनोट दिनांक- १९/०६/२०२० :-

कल्लाप्पा देवाप्पा शेरखाने, वय-५४, तलाठी तलाठी हुपरी सजा,ता.हातकणंगले, रा. प्लॉट नं. ५४, संभाजीपुर, चकोते शाळेजवळ, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर यांनी लाच मागणी करून लाच स्विकारलेबाबत.........

---

यातील तक्रारदार यांनी मे २०२० मध्ये हुपरी गावातील त्यांचे गट नंबर- १८७६ मधील शेतामध्ये गेल्या महीन्यामध्ये बोअरवेल मारली आहे. नमुद शेताचे ७/१२ पत्रकी बोअरवेलची नोंद घेणेसाठी तक्रारदार यांनी हुपरी तलाठी शेरखाने यांचेकडे दि. १६/०६/२०२० रोजी अर्ज दिला होता. तेव्हा तक्रारदार हुपरी तलाठी सजाचे कोतवाल मुधाळे यांना भेटले असता त्यांनी, तलाठी शेरखाने तुमचे शेतातील बोअरवेलची ७/१२ पत्रकी नोंद घेणेसाठी ३,०००/- रूपये मागत आहेत. पैसे दिल्याशिवाय ते तुमचे बोअरवेलची नोंद ७/१२ पत्रकात घेणार नाही, तेव्हा तुम्ही त्यांना जावून भेटा असे सांगितले. त्याबाबत तकारदार यांनी तलाठी शेरखाने यांचेविरूध्द तक्रारी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक १९/०६/२०२० रोजी हुपरी तलाठी कार्यालयमध्ये शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तलाठी शेरखाने यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये शेरखाने यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे शेताचे ७/१२ पत्रकी बोअरवेलची नोंद घेणेसाठी तडजोडीअंती २,०००/- रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

लागलीच आज दि. १९/०६/२०२० रोजी हुपरी तलाठी कार्यालयमध्ये सापळा कारवाई आयोजित केली असता, तलाठी शेरखाने यांनी पडताळणीवेळी मागणी केलेप्रमाणे २,०००/- रू. लाच रक्कम स्विकारल्याने त्यास रंगेहात पकडणेत आले आहे. सदरबाबत तक्रारदार/फिर्यादी यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक कल्लाप्पा देवाप्पा शेरखाने, वय-५४, तलाठी तलाठी हुपरी सजा,ता.हातकणंगले यांचेविरूध्द हुपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार पोलीस निरीक्षक श्री.युवराज सरनोबत, पोहेकॉ मनोज खोत, पोना शरद पोरे, नवनाथ कदम, सुनिल घोसाळकर, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

हुपरी,ता.हातकणंगले,जि.कोल्हापूर,
दिनांक -१९/०६/२०२०

<u>सी.आर.पी.सी.कलम १६६</u>

प्रति,
श्री.प्रशांत चौगुले,
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शनब्युरो , सातारा

विषय :- सापळा कारवाईचे अनुषंगाने घरझडती घेणेबाबत.

----००० ----

आम्ही युवराज सरनोबत, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर ठराव करतो की, आरोपी लोकसेवक कल्लाप्पा देवाप्पा शेरखाने, वय-५४, तलाठी तलाठी हुपरी सजा,ता.हातकणंगले, रा. प्लॉट नं.५४,संभाजीपुर, चकोते शाळेजवळ, जयसिंगपूर,ता. शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारलने त्यांचेविरुध्द सापळा कारवाई करणेत आली असून त्यांचेविरुध्द हुपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेचे कामकाज सुरु आहे.

आलोसे शेरखाने यांनी त्यांचे शासकीय सेवाकालावधीत संपादित केलेल्या मालमत्ते संबंधीत कागदपत्रे, रोख रक्कम इत्यादी त्यांचे राहाते घरी मिळण्याची शक्यता आहे. आम्ही सापळा कारवाईमध्ये व्यस्त असल्याने आलोसे शेरखाने यांचे नमूद पत्यावरील घराची घरझडती घेणेबाबत क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम १६६ प्रमाणे अधिग्रहण पत्र देत आहोत. तरी आपण आलोसे शेरखाने यांचे नमुद पत्यावर जावून घरझडती घ्यावी. झडतीबाबत पंचनामा करुन त्यामध्ये किंमती वस्तू,सामान व दस्तऐवज यांच्या किंमती नमुद कराव्यात. आपण केलेल्या घरझडतीचा अहवाल, सी.आर.पी.सी.कलम १६५(१) चे ठरावाचे प्रतीसह, पंचनामा व ताब्यात घेण्यात आलेल्या वस्तू/दस्तऐवज इत्यादी त्वरीत आमचेकडे सुपूर्द करावे.

<u>घरझडतीचे ठिकाण:-</u>

कल्लाप्पा देवाप्पा शेरखाने,
रा. प्लॉट नं.५४,संभाजीपुर, चकोते शाळेजवळ,
जयसिंगपूर,ता. शिरोळ, जि.कोल्हापूर

(युवराज सरनोबत)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर,
कॅम्प-हुपरी, ता.हातकणंगले,